# मानव भगवंताला का विसरला ?

मोठया आश्चर्याची गोष्ट आहे कि मंदिर, मस्जिद गिरजाघर व गुरुव्दारा मध्ये एकीकडे व्यक्ति म्हणतो कि, प्रभु, तूच एक माझा सहारा तु माझा मालक आहे, स्वाती आहे. तूच माझा पालनहार आणि तारणहार आहे. तु प्रेमाचा सागर आहेस, मी तुझ्या थेंब भर प्रेमचा भुकेला आहे किंवा तुझ्या दर्शनासाठी हे डोळे जन्म-जन्मांतरापासून तरसली आहेत. परंतु दुसरीकडे मनुष्य मी आणि माझे, देह आणि देहाचे बंधन, धन-दौलत, मौज-मस्तीत एवढा गुरफटला आहे कि त्याचे मन प्रभु चिंतनात क्षणभर टिकत नाही. तो ईश्वराची आठवण विसरतो, सत्संग सोडतो, कुसंगाच्या प्रभावात वाईट कर्म करतो, म्हणून हे आत्मविश्लेषण करणे आवश्यक आहे कि सर्वोच्च सुख व वरदान देणारा ईश्वर शेवटी विस्मृत का होतो ?

परिचय ः देहाच्या नात्यात परिचयाबिना मनुष्य एक-दुसऱ्याशी संबंध ठेवीत नाही. त्याच प्रमाणे परमात्म्याशी नाते-संबंध जोडण्यासाठी त्याचा सत्य व यथार्थ परिचय आवश्यक आहे. ईश्वराच्या संबंधात जेवढे मुख तेवढया गोष्टी लोक करतात. सर्व जण त्याचे वेगवेगळे नाव, रुप , धाम आणि कर्तव्य सांगतात. कारण कि सत्य परिचय नाहीये, मग सत्य परिचयाबिना त्याची आठवण कशी करणार ? हा सत्य परिचय पुरुषोत्तम संगम युगात परमात्मा स्वतः येऊन देतात. परमात्मा बिन्दुरुप ज्योति स्वरुप आहेत. परमधाम निवासी आहेत. त्यांचे नाव शिव आहे. ते सर्व गुण व शक्तिचे सागर आहेत. ते विश्व-कल्याणकारी, मुक्ती-जिवनमुक्ती दाता आहेत. त्यांना या स्थूल डोळयांनी नव्हे तर दिव्य ज्ञान व अनुभवाच्या नेत्रांनी अघितले जाऊ शकते.

निश्चय ः कोणत्याही कार्यात निश्चयाशिवाय सफलता मिळत नाही. जो पर्यंत दोन-व्यक्ति एकमेकावर निश्चय आणि भरोसा ठेवीत नाही तो पर्यंत त्यांची मैत्री किंवा संबंध शक्य होत नाही. परमात्मा प्राप्ति व स्मरण-सानिध्यासाठी सुध्दा हे आवश्यक आहे कि परमात्मा शिवने दिलेल्या परिचय आणि स्वरुपावर सम्पूर्ण निश्चय, आस्था, विश्वास तयार करावा. प्रजापिता ब्रम्हा हे त्यांचे साकार माध्यम. याच बरोबर आत्मविश्वास आणि आत्म-निश्चय देखील आवश्यक आहे कि मी या साधनेत यश अवश्य मिळवीन. आता सृष्टि परिवर्तनाचा काळ चालू आहे, या अंतिम समयी ईश्वरीय साधनेने सतयुगी स्वराज्याची प्राप्ति अवश्य होईल. अशा प्रकारे निश्चयबुध्दी आत्माच परमात्म्याची खऱ्या मनाने आठवण करु शकतो. म्हणूनच म्हटले जाते ''निश्चयबुध्दि विजयन्ती''.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com